# समाज विकासातील नवीन प्रवाह

**प्रा. विलास सोमाजी पवार**
सहा. प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, आदर्श महाविद्यालय, हिंगोली.
vilassomajipawar@gmail.com

---

## प्रास्ताविक

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जुन्या, पारंपरिक समाजाऐवजी एक नवीन विज्ञानदृष्टीसंपन्न, बुद्धिवादी आणि समतापूर्ण समाज स्थापित होईल, अशी आकांक्षा होती. ज्या ताकदीने आणि उमेदीने देश गुलामगिरीविरुद्ध लढला. त्याच ताकद व उमेदीने समाजाची पुनर्बांधणी करण्यासाठी आणि समाजात फूट पाडणाऱ्या शक्ती विरुद्ध लढण्यासाठी तत्पर होईल असेही वाटत होते. पण दुर्दैवाने हे स्वप्न आज पर्यंत पूर्णपणे यशस्वी होऊ शकले नाहीत. राष्ट्राच्या आंतरिक व बाह्य एकात्मतेवर सतत आक्रमणे होत आहेत. अनाचार अत्याचार आणि भ्रष्टाचाराने देश पोखरून निघत आहे. राजकीय आणि सामाजिक जीवनातून नीती नियमांचे उच्चाटन होत आहे. प्रबोधनाची इतकी दीर्घ परंपरा लाभलेला भारतीय समाज पुरेसा संपन्न झालेला नाही. विविधतेने नटलेल्या या भारतीय समाजाचे वेगवेगळे गट कधी भाषेच्या, कधी प्रदेशाच्या तर कधी धर्माच्या प्रश्नावर इतकी टोकाची भूमिका घेत आहे.त्यामुळे देश विभक्त होतो की काय असे वाटू लागते.

भारताचा संवेदनशील स्वभाव आणि समन्वयवादी भूमिका सदैव राहिलेली आहे.परस्परभिन्न विचारसरणी, आचार पद्धती, धर्म, पंथ, जाती यात वेगळेपण असले तरी एकवाक्यता अधिक प्रमाणात जाणवते.अतिशय संथ असली तरी परिवर्तनाची प्रक्रिया फार पूर्वीपासून या समाजात निरंतर चाललेली आहे.ब्रिटिश राजवटीपासून आज पर्यंत सामाजिक बदलाचे प्रयत्न वेगवेगळ्या सामाजिक चळवळी आणि समाजसेवकांनी केलेले प्रयत्न उल्लेखनीय आहे. आपल्या देशाची राज्यघटना एक आदर्श घटना असून ती समाजातल्या सर्व घटकांना न्याय देणारी असून मानवी स्वातंत्र्याचे पूर्णतः रक्षण करणारी आहे. भारतामध्ये आता जागतिकीकरणाचे वारे वाहू लागले आहे. विज्ञान संस्कृतीचाही वेगाने प्रचार व प्रसार होत असून समाजावर असलेला अंधश्रद्धेचा पगडा हळूहळू कमी होत आहे. नव समाजाच्या सामाजिक पुनर्बांधणीसाठी परिवर्तनाची प्रक्रिया अत्यंत आवश्यक आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने समाजात सर्वच क्षेत्रात अमुलाग्र बदल घडवून येत आहेत. सोबतच अनेक सामाजिक प्रश्नही निर्माण होत आहेत शेतकरी, कामगार, महिला इत्यादींचे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. वैज्ञानिक शोधांनी जगात नवी विज्ञान संस्कृती जन्मालाआली.समताधिष्ठित असा समाज अस्तित्वात येण्यासाठी सामाजिक पुनर्बांधणी होण्याची गरज आहे. तेव्हा आपणास समाज विकासातील काही नवीन घटकांचा आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

**◆ शोधनिबंधाची उद्दिष्टे :-**

१) समाज विकासाची पार्श्वभूमी अभ्यासणे.

२) सामाजिक समस्या आणि आव्हाने यांचा आढावा घेणे.

3) समाज विकासाची पायाभरणी अभ्यासणे.

४) समाज विकासातील नवीन प्रवाहाचा आढावा घेणे.

५) बदलत्या समाज प्रवाहांचा अभ्यास करणे.

◆ **शोधनिबंधाची गृहीतके :-**

१) विकासाची पार्श्वभूमी विकासाकडे वाटचाल करणारी आहे.

२) सामाजिक समस्या आणि आव्हाने चिंतित करणारी आहेत.

३) समाज विकासाची पायाभरणी संथ गतीने झाली.

४) बदलते नवीन प्रवाह विचारात घेण्यासारखे आहेत.

५) विज्ञान व जागतिकीकरणाचा प्रभाव दिसून येतो.

◆ **संशोधन पद्धती :-**

समाज विकासातील नवीन प्रवाह या शोधनिबंधाच्या अभ्यासासाठी संशोधन पद्धतीतील अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या दुय्यम साधनसामग्रीचा अवलंब करून अध्ययन करण्यात आलेला आहे. यात प्रामुख्याने विविध प्रकाशित पुस्तके, संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, वृत्तमानपत्रे आणि संकेतस्थळांचा अवलंब करून सदर शोधनिबंधाचे निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत.

◆ **सामाजिक प्रश्न आणि आव्हाने :-**

समाज विकासातील नवीन प्रवाहाचा सामाजिक दृष्टिकोनातून विचार करता समाज परिवर्तनाच्या प्रक्रियेतून भारतीय समाजात अनेक सामाजिक प्रश्न निर्माण झालेले आहेत. वाढती लोकसंख्या हा एक फार मोठा सामाजिक प्रश्न भारतापुढे आ वासून उभा आहे. त्यामुळे अनेक पंचवार्षिक योजनांची अंमलबजावणी होऊनही विकासाची फळे पदरात पडली नाहीत. ज्या प्रमाणात लोकसंख्या वाढत आहे त्या प्रमाणात राष्ट्रीय संपत्ती, दरडोई उत्पन्न वाढलेले नाहीत. त्यामुळे लोकांचे जीवनमान उंचावलेले दिसत नाही. वाढत्या लोकसंख्येतून उद्भवणारा दुसरा सामाजिक प्रश्न म्हणजे प्रदूषणातील वाढ आणि पर्यावरणाचा ऱ्हास होय. आज मोठ्या शहरांमध्ये जल, वायू, ध्वनी प्रदूषणाने धोक्याची पातळी ओलांडली आहे. वाढत्या उद्योगाने कारखानदारीमुळे पिकाऊ जमीन कमी होत असून नैसर्गिक पर्यावरणाला धक्के बसू लागले आहेत. आज सुरू असलेले संप, बंद, मोर्चा, हरताळ, रास्ता रोको इत्यादीमुळे सामान्यांचे सामाजिक व्यवहार विस्कळीत झालेले आहे. खून, चोऱ्या, दरोडे,जुगार, मारामाऱ्या, बलात्कार गुन्हेगारी, बाल गुन्हेगारी यांचे प्रमाण वाढत असून सामाजिक सुरक्षितता कमी होत चाललेली आहे. व्यवसाय व नोकरी धंद्याच्या निमित्ताने शहरात होणारे स्थलांतर हेही फार मोठा सामाजिक प्रश्न झालेला आहे.वरील सामाजिक  प्रश्न सोडविण्यासाठी पहिल्यांदा सक्तीचे कुटुंब नियोजन

सर्वांवर लादल्याशिवाय लोकसंख्या वाढीच्या समस्येवरील उकल होणे कठीण आहे. तसेच कायद्याच्या संरक्षणाची गरज आहे.

भारतीय समाजाचे झपाट्याने होत चाललेल्या बदलाचे स्वरूप समजून घ्यावे लागेल. ब्रिटिशांनी भारतावर दीडशे वर्षे राज्य केले त्यांच्या सहवासामुळे भाषा, भूषा, भवन, भोजन या घटकांमध्ये ही विलक्षण परिवर्तन घडून आले.जुनी चाळ संस्कृती मागे पडत असून फ्लॅट, कुंपण संस्कृतीचा उदय होत आहे. नवे ज्ञान विज्ञान तंत्रज्ञान अचार विचार यांचा खुल्या मनाने स्वीकार करणे म्हणजे आधुनिकीकरण होय. या प्रक्रियेमुळे जुन्या मूल्यांच्या जागी नव्या मुल्यांची स्थापना झाली आहे.

थोडक्यात भारतीय समाजाने समता, स्वातंत्र्य, बंधुता, लोकशाही जीवनप्रणाली, सर्वधर्मसमभाव, राष्ट्रीय एकात्मता, आदी मूल्यांचा स्वीकार करून स्वतःचे मोठ्याप्रमाणात आधुनिकीकरण करून घ्यायला प्रारंभ केला आहे. त्यामुळे सामाजिक गतिशीलता झपाट्याने वाढली भारत सरकारही पुरोगामी कायदे करून आधुनिकीकरणाला चालना देऊ इच्छित आहे म्हणून ही प्रक्रिया संख्यात्मक आणि गुणात्मक दृष्टीने महत्त्वाची आहे.

**◆ नवे आर्थिक धोरण :-**

भविष्यकालीन आर्थिक धोरण ठरविताना देशाच्या भूतकालीन आर्थिक परिस्थितीचा विचारही केला पाहिजे. राष्ट्राच्या आर्थिक यंत्रणेत व्यक्तीला महत्त्व असले तरी समाजाच्या व्यापक हितासाठी सरकारनेही महत्त्वाची भूमिका पार पाडली पाहिजे.भारतातील उद्योगधंद्यांना परदेशी उद्योगधंद्याच्या आणि व्यापाराच्या स्पर्धेपासून संरक्षण दिले पाहिजे.नवीन उद्योगधंदे चालू करण्यासाठी भारतीय उत्पादकांना भांडवल पुरवावे,भारतात ज्या मालाचे उत्पादन होते अशा मालाची आयात करू नये.मुळात या देशातील दारिद्र्याचे अस्तित्व सिद्ध करण्याची गरज नाही ती केवळ परकीय सत्ता व स्पर्धा यामुळे उद्भवलेली असेही नाही दारिद्र्याचा हा वारसा फार जुना आहे हे सर्व पुसून काढण्यासाठी नव्या आर्थिक धोरणाची नितांत गरज आहे. बेकारी, दारिद्र्य यासोबतच समाजातील आर्थिक विषमता कमी होण्याऐवजी वाढतच चाललेली आहे.सामाजिक सुरक्षितता, महागाई यात सरकारला फारसे यश मिळालेले दिसून येत नाही. संपूर्ण अर्थव्यवस्थेची खाजगी, सार्वजनिक आणि संयुक्त अशा तीन क्षेत्रात विभागणी होते तेव्हा तिला मिश्र अर्थव्यवस्था असे म्हणतात. भारताने अशी मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारली असली तरी भारतापुढे लोकसंख्यावाढ, कुपोषण, बेकारी दारिद्र्य आणि निर्वासितांचे पुनर्वसन हे मुख्य आर्थिक प्रश्न निरुत्तरित आहेत. भूमि सुधार योजना, शेतीची उत्पादनक्षमता वाढविणे. आधुनिक तंत्राचा वापर करून ग्रामीण क्षेत्रात उद्योगधंदे निर्माण करावेत असे भारताचे सर्वसाधारण आर्थिक धोरण होते त्यात आज परिवर्तन होत आहेत. तत्कालीन अर्थमंत्र्यांनी भारताच्या नव्या आर्थिक धोरणाची घोषणा केली परकीय भांडवल गुंतवणुकीवरील निर्बंध हटविण्यात आले आयात मालावरील कर कमी करण्यात आला बँकांना अधिक स्वायत्तता देण्यात येऊन भांडवल बाजार सुधारण्यावर भर देण्यात आला उदारीकरण आणि जागतिकीकरणामुळे भारताचे केवळ आर्थिक जीवनच नाही तर सामाजिक व सांस्कृतिक जीवनही ढवळून निघत आहे भारतात जगातील अनेक

E-ISSN NO:2349-0721

बहुराष्ट्रीय कंपन्यांचे आगमन होत असून त्या मालाबरोबर आपली संस्कृतीविशेष जीवनपद्धतीही विकू लागले आहेत देशातील नागरिकांच्या चारित्र्य संवर्धनाकडे पूर्णपणे दुर्लक्ष होत आहे तरुण पिढी पाश्चात्त्य चंगळवादाला बळी पडण्याची भिती वाढली आहे

बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या भारतातील वाढत्या प्रभावामुळे नवे आर्थिक प्रश्न जन्माला आलेले आहेत बहुराष्ट्रीय कंपन्यां केवळ वितरकांचे काम करण्यात धन्यता मानतात त्यामुळे भारतातील देशी उद्योगांचे भवितव्य धूसर होत चाललेले आहे ग्रह उद्योग, कुटीर उद्योग, ग्रामीण उद्योग मोडीत निघत आहे त्यामुळे बेकारी वाढण्याचा धोका वाढला आहे. थोडक्यात, सामान्य लोकांचे राहणीमान उंचावणे, बेकारीचे निर्मूलन करणे, आर्थिक विषमता कमी करणे, सामाजिक सुरक्षितता वाढविणे, किमतीच्या पातळी स्थिर ठेवणे इत्यादी बाबी आर्थिक दृष्टिकोनातून करणे महत्त्वपूर्ण ठरत आहे नव्या आर्थिक धोरणानुसार सरकार उदारीकरण,  जागतिकीकरण, खाजगीकरणावर भर देत आहे त्यामुळे रस्ते,वीज, पाणी, आरोग्य यासारख्या महत्त्वपूर्ण गरजा भागविण्याच्या क्षेत्रात खाजगी कंपन्या येऊ घातले आहेत त्यातून अनेक क्षेत्रात पैसे मोजा आणि सोयीसुविधा मिळवा असा नवा मंत्र रुढ होऊ लागलेला आहे.

◆ **राजकीय परिवर्तन :-**

सोळाव्या शतकापासून भारतात व्यापारी म्हणून आलेले ब्रिटिश नंतर राज्यकर्ते म्हणून वावरू लागले. संपूर्ण बंगाल प्रांत ताब्यात घेतल्यानंतर त्यांच्या भारतावर राज्य करण्याची अभिलाषा निर्माण झाली. त्यासाठी त्यांना तत्कालीन मराठेशाहीच्या सत्तेशी संघर्ष करावा लागला. सन १८१८ मधे पेशवाई समाप्त होऊन भारतात फार मोठे राजकीय परिवर्तनाला सुरुवात झाली. एकोणिसाव्या शतकातील सामाजिक परिस्थिती या राजकीय परिवर्तनाला अनुकूल होती. या काळातील भारतीय समाजाचा मागासलेपणा आणि ब्रिटिशसत्तेची अभिवृत्ती व भौतिक साधन सामग्री यांचा मेळ राजकीय परिवर्तनात घातला गेला. मात्र त्यांचे अंतिम धोरण आर्थिक पिळवणूक हेच होते.जाती, धर्म, भाषा, संस्कार यात विविधता असलेले भारतीय भूप्रदेश सलगपणे एकाच वेळी ब्रिटिश राजवटीखाली आले त्यामुळे भारतातील राजकीय परिवर्तन क्रांतिकारक न ठरता उत्क्रांतीमय स्वरूपाचे झाले. संघर्ष, समन्वय आणि अनुकरण असे या राजकीय परिवर्तनाचे स्वरूप होते. भारतात ब्रिटिश राजवट जसजशी स्थिरावत गेली आणि विस्तारित गेली तसतशी व्यक्तिस्वातंत्र्य आणि उदारमतवाद ही दोन मूल्य भारतीय समाज जीवनात महत्त्वाची झाली.

मुळातच भारतीय लोकशाही पक्षाधिष्टीत आहे. प्रत्येक राजकीय पक्षाचे स्वतंत्र असे तत्त्वज्ञानही आहे. प्रत्येक निवडणुकीच्या वेळी हे राजकीय पक्ष आपापले जाहीरनामे मतदारांसमोर सादर करीत असतात त्यात आश्वासने आणि प्रलोभने यांची विविधता असते ती स्वाभाविक असली तरी तिच्या मुळाशी समाज कल्याणकारी धोरणे आणि योजना याबाबत एकवाक्यता दिसून येत नाही. स्वातंत्र्योत्तर भारतात राजकीय समतेच्या दृष्टीने राजकीय पक्षांनी भरीव कामगिरी केली ग्रामपंचायतीपासून संसद भवनापर्यंत राजकारणाचे क्षेत्र विस्तारित झाले स्थानिक नेतृत्वा पासून राष्ट्रीय नेतृत्वा पर्यंत समाजविधायक विचारसरणी मोठ्या प्रमाणात रुजली राजकीय जनजागृतीही झालेली जाणवते असे असूनही

वास्तविक राजकीय समता प्रस्थापित होण्यासाठी प्रत्येक भारतीय नागरिकाला सजग सावध राहावे लागणार आहे.राजकीय हेतूंनी प्रेरित होणाऱ्या फुटीरतावादी चळवळींना पायबंद घालावा लागणार आहे. थोडक्यात, आर्थिक, सामाजिक, राजकीय समतेसाठी सामाजिक पुनर्बांधणी आणि तिच्या हितासाठी व्यापक पद्धतीने राजकीय परिवर्तन प्रक्रिया अत्यंत आवश्यक आहे.

◆ **शैक्षणिक धोरण :-**

ब्रिटिश राज्यकर्त्यांनी भारतीय लोकांना शिक्षण देणे हे आपले कर्तव्य मानले त्याचप्रमाणे त्यांनी मिशनरी लोकांना शिक्षण संस्था सुरू करण्यासाठी मदतही केली सरकारद्वारे काही शाळाही सुरू करण्यात आल्या नव्या इंग्रजी शिक्षणाची पायाभरणी मुंबई प्रांताचे गव्हर्नर माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांनी केली. सोबतच ईस्ट इंडिया कंपनीला शिक्षण विस्ताराची योजना सादर केली याच्यात लोकांच्या धार्मिक श्रद्धांना धक्का न लावता त्यांना विज्ञानाभिमुख शिक्षण देण्यावर भर दिला. पाश्चात्त्य विद्येच्या शिक्षणामुळे लोकांना भौतिक जगाविषयी माहिती झाली. एलफिस्टन यांच्या प्रेरणेतून डेक्कन एज्युकेशन सोसायटी, शिक्षण प्रसारक मंडळ, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी इत्यादी अनेक शिक्षण संस्थांची सुरुवात झाली. एका दिव्याने दुसरा दिवा लावावा याप्रमाणे शिक्षण संस्थांची सुरुवात झाली त्यामुळे एकोणिसाव्या शतकात शैक्षणिक क्षेत्र उजळून निघाले.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात पाश्चात्य शिक्षणाचा प्रभाव वाढू लागला शाळा महाविद्यालय आणि सामाजिक संस्थांचे प्रमाण वाढले सभा-संमेलने आणि वृत्तपत्रातून धर्मव्यवस्था समाजव्यवस्था वर्णव्यवस्था जातीव्यवस्था स्त्री पुरुष समानता विवाह पद्धती इत्यादी अनेक विषयावर साधक-बाधक चर्चा होऊ लागली त्यामुळे सामाजिक जागृती झाली.असे असले तरी आज मोठ्या प्रमाणात शिक्षणाचे खाजगीकरण सुरू झाल्यामुळे सर्वसामान्यांचे शिक्षण दुरापास्त होत आहे. राजकीय मंडळींचा शिक्षण क्षेत्रात शिरकाव झाल्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात स्पर्धा निर्माण झाली आहे. व्यवसायाभिमुख शिक्षणाचा अभाव असल्यामुळे बेकारी च्या प्रमाणात वाढ झालेली आहे.शैक्षणिक क्षेत्रातील जीवघेण्या स्पर्धेमुळे अनेक विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले आहे त्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात मूलभूत, पायाभूत अशा बदलाची गरज भासत आहे.

◆ **धार्मिक दृष्टिकोन :-**

जगातील अनेक देशांमध्ये सध्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला गती प्राप्त झालेली आहे. त्यामुळे हे विश्व अधिकाधिक जवळ येत असून ते एखाद्या खेड्यासारखे लहान होत चाललेले आहे. अर्थात ही विज्ञानाची किमया आहे भारतीय धर्म समाज आणि संस्कृती जागतिकीकरणाच्या वाटेवरून मार्गक्रमण करत आहे गेल्या अनेक वर्षात जे घडले नाही ते आज घडीला बदलत आहे या दृष्टीने भारताला जगावर आपल्या संस्कृतीचा अध्यात्मिक तत्वज्ञानाचा ठसा उमटविण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आर्थिक वर्चस्व आणि वैज्ञानिक घडामोडी यांच्या आधी धर्म आणि संस्कृतीचा विलय शक्य आहे का याचा विचार करावा लागेल आणि तो शक्य नाही असेच जगाचा इतिहास

E-ISSN NO:2349-0721

सांगतो. भारतीय संस्कृतीशी संबंधित सर्व प्रमुख धर्म कसोटीला उतरतील आणि उदात्त भारतीय संस्कृती विश्वधर्मात्माक होऊ शकेल असा विश्वास वाटतो त्यासाठी धर्म संस्थेला सर्वश्रेष्ठ सामाजिक संस्थेचा दर्जा द्यावा लागेल, मूलतत्त्ववाद यांना लगाम घालावा लागेल, धर्मातील दोष आणि उणीवा नष्ट करून त्यांच्यात काळानुरुप परिवर्तन घडवून आणावे लागेल. थोडक्यात, धर्म हा समाज जीवनाचे केवळ एक अंग नसून तो संपूर्ण समाज जीवन उन्नत करणारे एक व्यापक तत्त्व आहे.

**◆ सारांश किंवा निष्कर्ष :-**

भारतीय समाज रचना अत्यंत गुंतागुंतीची आहे. त्यामुळे भारतातील परिवर्तनाची प्रक्रियाही सहजासहजी समजण्यासारखी नाही. महानदीचा प्रवाह तळाशी वाहत असताना वर वर पाहणार्याला त्याचा थांगपत्ता लागत नाही याच प्रमाणे येथील समाजरचना, समाजव्यवस्था आणि समाजजीवन आहे.प्रदीर्घ परंपरा लाभलेली परिवर्तन प्रक्रिया कोणत्याही काळात ठळक स्वरूपात दिसली नसली तरी ती अखंड पणाने सुरू आहे असे आपल्या लक्षात येईल. सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक अशा अनेक क्षेत्रांमध्ये विविध सामाजिक समस्या उद्भवत असून त्यांच्या सोडवणुकीसाठी मूलभूत व पायाभूत अशा उपायांची गरज आहे. नवीन बदलत्या समाजात जागतिकीकरण, वैज्ञानिक दृष्टिकोन, बदलते राजकीय शैक्षणिक समीकरणे समाजाला न्याय देतीलच असे नाहीत. म्हणून सामाजिक समस्या सोडविण्यासाठी पायाभूत आणि चिरकाल टिकणाऱ्या उपायांची गरज आहे.

**◆ संदर्भसूची**

१) भारतीय समाज: वादातीत विषय आणि समस्या ------ प्रा एस एन गंदेवार

२) भारतातील सामाजिक कल्याण: प्रशासन व समाजकार्य ----- प्रा लक्ष्मण कोत्तापल्ले

३) भारतीय सामाजिक विचारवंत--- डॉ. दा धो काचोळे

४) भारत में समाज: संरचना येवं परिवर्तन ----- प्रो एस एल गुप्ता, डॉ डी डी शर्मा

५) भारतीय समाज समकालीन समस्या---- डॉ धारवाडकर, डॉ भालेराव

६) भारतातील सामाजिक चळवळी ---प्रा सिद्धेश्वर कोळे, प्रा संग्राम आंदे

७) ग्रामीण समाजशास्त्र ---- डॉ. दा धो काचोळे

८) भारतीय सामाजिक समस्या ----- डॉ. गंदेवार

IEJRD
E-ISSN NO:2349-0721